# तिफण

वर्ष : १४ वे । अंक ४ था
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च - २०२३
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal




# यशवंतराव चव्हाण
## विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १४ वे, अंक - ४ था
जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३
भाग - २

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

◆ संपादक ◆
**डॉ. शिवाजी हुसे**

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी,हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - ४३१४०३, मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/2009 - TC

वर्ष १४ वे, अंक - ४ था                जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

## यशवंतराव चव्हाण विशेषांक

◆ संपादक ◆

डॉ. शिवाजी हुसे

◆ अतिथि संपादक ◆

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

डॉ. राजकुमार मरे

◆ संपादक मंडळ ◆

| | | |
|---|---|---|
| डॉ. सर्जेराव जिगे | डॉ. ताहेर पठाण | डॉ. दिलिप बिरुटे |
| डॉ. सुभाष बागल | डॉ. रामचंद्र झाडे | डॉ. दत्तात्रय डुंबरे |
| डॉ. सुभाष शेकडे | डॉ. सुखदेव इगारे | डॉ. प्रेमला मुखेडकर |
| डॉ. राजकुमार मुसणे | डॉ. सुधाकर जाधव | डॉ. रंजना कदम |

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या संपादक सहमत असतीलच असे नाही, या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३, मो. ९९०४००३९९८

## भाग - २ अनुक्रमणिका



| अनु क्र. | लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | यशवंतराव चव्हाण यांची ऐतिहासिक वाटचाल आणि त्यांची भाषणे<br>**डॉ. सोमनाथ दत्तात्रय कदम** | ७९-८४ |
| १४ | यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकीर्दीचा महाराष्ट्राच्या अनुषंगाने अभ्यास<br>**श्री. जमादार फिरोझखान इमाम** | ८५-८९ |
| १५ | यशवंतराव चव्हाण यांचे कृषीविषयक विचार<br>**आकाश संभाजी ढोले**<br>**डॉ. सुनिल अण्णा गोरडे** | ९०-९४ |
| १६ | संयुक्त महाराष्ट्र चळवळ व यशवंतराव चव्हाण<br>**डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव** | ९५-९८ |
| १७ | यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचे कृषी व सहकार विषयक विचार व कार्य<br>**डॉ. महेंद्र केरबा गजधाने** | ९९-१०१ |
| १८ | महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था आणि यशवंतराव चव्हाण<br>**प्रा. डॉ. आर. बी. वनारसे** | १०२-११० |
| १९ | यशवंतराव चव्हाण यांचे शेती आणि विकासातील योगदान<br>**डॉ. सुनिल अण्णा गोरडे** | १११-११६ |
| २० | यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या कृषी, उद्योग व आर्थिक विकासात योगदान<br>**डॉ. वाघमारे माणिक एस.** | ११७-१२१ |
| २१ | शैक्षणिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक विचार व कार्य<br>**श्रीमती भारती श्याम पाटील** | १२२-१२७ |
| २२ | यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासातील योगदान<br>**डॉ. विजया जितेंद्र राऊत** | १२८-१३५ |
| २३ | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व आर्थिक विचार<br>**डॉ. भगवान सांगळे** | १३६-१३९ |
| २४ | यशवंतराव चव्हाण यांची शिक्षणविषयक भूमिका आणि कार्य<br>**डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव** | १४०-१४७ |
| २५ | यशवंतराव चव्हाण व त्यांची राजकीय वाटचाल<br>**सविता भिवा धनवडे** | १४८-१५१ |



# १५. यशवंतराव चव्हाण यांचे कृषीविषयक विचार

**आकाश संभाजी ढोले**
संशोधक विद्यार्थी
**डॉ. सुनिल अण्णा गोरडे**
मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, औरंगाबाद. (महा.)

**जीवन परिचय**

यशवंतराव बळवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री होते. त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान म्हणून काम पाहिले होते. यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात. ते प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिक होते." युगांतर"," सह्याद्रीचे वारे"," कृष्णाकाठ"," ऋणानुबंध" ही त्यांची साहित्य संपदा आहे.

**प्रस्तावना**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती हा बहुतांश लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. परंतु शेती मान्सून पावसावरील अवलंबून असल्याचे दिसून येते. मनाजोगते पाऊस पाणी झाले तरच शेती नाहीतर निव्वळ माती! अशी येथील व्यवस्था आहे. परंतु निश्चय आणि कठोर परिश्रम यातून डोंगर सुद्धा हलवता येतो अशी त्यांची धारणा असल्याचे दिसून येते. शेतीमध्ये सुधारणा झाली पाहिजे, शेतकऱ्यांच्या शेतमालाला वाजवी भाव मिळाला पाहिजे असे त्यांच्या आर्थिक धोरणाचे सूत्र होते. शेतमालाचे उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक कृषीतंत्र बी-बियाणे ,खते मालाची घाऊक विक्री, राज्यातील शिल्लक अन्नधान्य, कापूस खरेदी,साखर कारखाने, तेलबिया व शेतमालाच्या व्यापारात गुंतलेले श्रीमंत ठेकेदार इत्यादी संबंधात त्यांचे काही ठोस निर्णय होते. कोणत्याही परिस्थितीत शेती हुकूमशाही करू नये. यावर त्यांचा कटाक्ष होता. शासन यंत्रणा व शेतकरी शेतमालावर गुजरणा करणारे असंख्य कष्टकरी, कामकरी यांच्या जिवाभावाच्या नातेसंबंधावर त्यांचा दृढ विश्वास होता. गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्राच्या व देशाच्या पातळीवर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा भयावह प्रश्न त्यांनी ओळखला व तीव्रता कमी करण्यासाठी कृतीतून प्रयत्न केल्याचे दिसून येते. यशवंतराव चव्हाण यांनी शेती, सहकार, समाज, साहित्य व संस्कृतीचा गांभीर्याने विचार केला. राष्ट्राच्या प्रगतीच्या मोजमापाची फुटपटीही साधी होती. एखाद्या राष्ट्राने कितीही प्रगती केली विज्ञानाची प्रगती वाढली तरीही शास्त्रज्ञाचे पाय जमिनीवरच असतात. यात जमिनीतून उगवलेला ज्वारीचा भाकरीचा कण त्यांच्या पोटात गेल्याशिवाय त्याचे सुपीक डोके रॉकेटच्या किंवा चंद्र -ताऱ्यांचा विचारही करू शकणार नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते म्हणूनच शेतीच्या प्रश्नाला त्यांनी अग्रक्रम दिल्याचे दिसून येते.

**उद्दिष्टे**

१. यशवंतराव चव्हाण यांचे कृषीविषयक योगदान अभ्यासणे.

**यशवंतराव चव्हाण यांची कृषिविषयक भूमिका**

यशवंतराव चव्हाण यांनी कृषीविषयक विचार मांडताना शेतीच्या मालकीहक्काचा प्रश्न, भूमिहिनांचा प्रश्न आणि कृषी विकासासाठी उपाय यावर अधिक भर दिला. याकडे जर आजच्या सरकारने सकारात्मक दृष्टीने पाहिले, तर शेतक-यांना आत्महत्या कराव्या लागणार नाहीत. यशवंतरावांच्या मते, जमीन कसणारा शेतजमिनीचा मालक असावा. यशवंतरावांनी सामाजिक क्षमता व सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून शेतीचा विचार केला. भारतात शेती क्षेत्रात भूमिहिनांची संख्या अधिक आहे म्हणून वाजवीपेक्षा अधिक जमिनी असणा-या लोकांनी त्यांच्या जमिनीच्या एक ते दोन टक्के जमीन त्यांना द्यावी, ही भूमिका त्यांनी धाडसाने मांडली होती. यावर आपल्याला टीकेला, कोणाच्या रोषाला सामोरे जावे लागेल याचा विचार त्यांनी केला नाही. याचे कारण, यशवंतराव चव्हाण हे मूठभरांपेक्षा सामान्यांचा विचार करणारे होते. तसेच जमीन अविकसित असल्याने ती अनुत्पादक व पडीक राहिली आहे. अशा जमिनी लागवडीखाली आणणे आवश्यक आहे. शेती व्यापारी तत्त्वाने केली पाहिजे. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत. यावर यशवंतरावांचा भर होता. त्यामुळे शेतक-यांना समाधान होते. आज शेतक-यांच्या होणा-या आत्महत्या, त्यांना करावी लागणारी आंदोलने, त्यांचे विधान भवनावर येणारे मोर्चे पाहिले तर वाटते की, या राज्यकर्त्यांनी एकदा यशवंतरावांच्या विचारांचा अभ्यास करावा. शेतकरी जगला पाहिजे, तरच आपल्या जगण्याला अर्थ आहे हे सांगण्याची आता वेळ आली आहे.

**महाराष्ट्राच्या विकासाचे स्वप्न**

यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार प्रामुख्याने शेती, उद्योग, सहकार, समाजवाद, आर्थिक विषमता, विकासातील समस्या आणि नियोजनाचे महत्त्व इत्यादीशी निगडित आहेत. नव्याने निर्माण झालेल्या महाराष्ट्राचा विकास सहकाराच्या माध्यमातूनच होऊ शकतो, हे लक्षात घेऊन त्यांनी सहकारी चळवळीला उत्तेजन दिले. ही चळवळ ग्रामीण भागातून उभी करण्याचे काम त्यांनी केले. हे करत असताना राज्यातील महत्त्वाच्या उद्योजकांनाही त्यांनी चांगले प्रोत्साहन दिले. खासगी क्षेत्रातूनही उद्योग चालले पाहिजेत यासाठीही त्यांनी प्रोत्साहन दिले. कारण, उद्योग वाढला तर रोजगार वाढणार आहे, हे यशवंतरावांचे धोरण होते. महाराष्ट्राचा विकास हा शेतीचा विकास, रोजगार आणि उद्योग वाढीवर आहे, हे ओळखून त्यांनी काम केल्याचे आढळून येते.

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची स्थापना**

विविध आर्थिक संस्था, महामंडळ स्थापन करण्यासाठी यशवंतरावांनी प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळाची स्थापना १५ डिसेंबर १९६५ रोजी कंपनी कायदा १९५६ नुसार झाली. स्थापनेपासूनच कंपनीनेने शेतकरी बांधवांना कृषी उत्पादन वाढीसाठी सदैव सामर्थ्य दिले आहे. भारतीय स्वातंत्र्यापासून महाराष्ट्र हे देशाच्या कृषी व औद्योगिक विकासाचे उर्जास्त्रोत आहे. देशातील सर्वात श्रीमंत व प्रगतशील राज्यांमध्ये गणला जाणारा महाराष्ट्र, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला चालना देणारे राज्य असून परकीय गुंतवणुकीसाठी प्रधान्याने निवडले जाते. भारतीय कृषी क्षेत्रातील महाराष्ट्राचे योगदान महत्वपूर्ण आहे. प्रामुख्याने कृषिप्रधान अर्थव्यवस्था असणाऱ्या या राज्याची ५५% लोकसंख्या शेती व शेतीपूरक व्यवसायांमध्ये गुंतलेली आहे. देशातील ४४.३% सिंचनाखालील क्षेत्राच्या तुलनेत महाराष्ट्रातील लागवडीखालील एकूण क्षेत्राच्या १८.९% क्षेत्र सिंचनाखाली आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या द्रष्ट्या व सर्वसमावेशक धोरणांमुळे महाराष्ट्राच्या विकासाला चालना मिळाली असल्याचे दिसून येते.

### समतोल विकासाचे पुरस्कर्ते

नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला पाहिजे. नद्यांवर धरणे बांधली पाहिजेत. धरणे बांधल्याने विस्थापित होणा-या लोकांचे पुनर्वसन केले पाहिजे. शेतक-यांनी कृषी शास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, असे मत यशवंतरावांनी मांडले होते. यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते. म्हणून विकास योजना आखताना अविकसित विभागांचा आधी विचार केला पाहिजे. ग्रामीण औद्योगिकीकरणाबाबत ते म्हणतात की, ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योगांची सांगड घातली जावी. शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची सांगड घालून शहरांकडे धाव घेणारा श्रमिकांचा लोंढा थोपविता येईल. औद्योगिक विकासासाठी नियोजन महत्त्वपूर्ण आहे. देशाचा संतुलित आर्थिक विकास व्हावा यासाठी औद्योगिक विकासाच्या मास्टर प्लानची कल्पना त्यांनी मांडली. अविकसित भागात विकासासाठी त्यांनी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली. हे सगळे आपल्या सरकारच्या बळावर शक्य आहे. फक्त सरकारची इच्छाशक्ती आवश्यक आहे. आज मेक इन इंडिया, मॅग्नेटिक महाराष्ट्रसारख्या कल्पना सरकार करते आहे. पण, जुने प्रकल्प आज मोडकळीस येत आहेत. त्यांना कसले संरक्षण नाही, त्यांचे पुनरुज्जीवन करण्याची गरज आहे. औद्योगिक रोजगार संपुष्टात येत आहे, अशा परिस्थितीत नव्या योजना आणण्यापेक्षा जुन्यांकडे नीट लक्ष दिले, तर आपोआपच अच्छे दिन येतील. यशवंतरावांनी योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यावर भर दिल्याचे दिसून येते.

### वंचित घटक व शेती क्षेत्राचा विकास यातील योगदान

यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी शेती क्षेत्राला अग्रक्रम दिला. शेती क्षेत्रातील कृषीवर आधारित योजना आखताना विकासामध्ये पाठीमागे असलेल्या विभागांच्या आधी विचार केला पाहिजे असे त्यांचे मत होते. आपला शेतकरी प्रगत झाला तर आपला देश प्रगत होईल. त्यांनी शेतीला दिलेले प्राधान्य हे आताच्या काळात फायदेशीर ठरत असल्याचे दिसून येते. वंचित घटकांचा विकास होण्यासाठी आणि शेती क्षेत्राचा विकास होण्यासाठी वर्तमान दशकातील अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती या घटकांसाठी असलेली बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना तसेच मुक्त वसाहत योजना वंचित समाजासाठी व शेती क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वाच्या असल्याच्या दिसून येतात.

### शेतीसाठी पाणी वआर्थिक विकास

राज्य पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ करून यशवंतराव चव्हाण यांनी आर्थिक विकासाचे नियोजन केले होते. आपल्या अनुभवाचा पुरेपूर फायदा या देशाला झाला पाहिजे, कृषी आणि सामान्य घटकाला त्याचा फायदा मिळाला पाहिजे, हे यशवंतरावांचे स्वप्न होते. त्यादृष्टीने त्यांनी आर्थिक विकासावर भर दिला होता. यातूनच त्यांनी कोल्हापूर प्रकारच्या बंधा-यांचा प्रचार केला. महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणून ज्याचे वर्णन केले जाते, त्या कोयना धरणाच्या निर्मितीसाठी यशवंतरावांचे नियोजन महत्त्वाचे होते. कोयना आणि उजनी ह्या प्रमुख प्रकल्पांच्या उभारणीला गती त्यांनी दिली. त्यातून मूलभूत सोयी-सुविधांचा विकास साधण्यावर भर दिला.

### कोयना व उजनी या दोन पाटबंधारे प्रकल्पाची उभारणी

यशवंतराव चव्हाण हे शेतीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी कोयना आणि उजनी ह्या प्रमुख प्रकल्पाच्या उभारणीला गती दिली आपल्या देशात शेतीसाठी पाणी ही खूप मोठी समस्या होती.शेतीला पाणी नसल्याकारणाने शेतकरी त्रस्त होता. या दोन प्रकल्पाची उभारणीचा उद्देश शेती पूरक सिंचन असा होता. जलविद्युत, पिण्याचे पाणी, औद्योगिक पाणी पुरवठा आणि मत्स्यव्यवसाय संबंधित

विकासाचे बहुउद्देशीय लाभ या प्रकल्पातून निर्माण झाल्याचे दिसून येतात. सिंचनाचा पुरवठ्यामुळे विशेषतः शेतीला फायदा होतो. जलाशयातुन शेती क्षेत्राला सिंचनासाठी पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचे प्रामुख्याने दुष्काळ आणि दुष्काळ परिस्थितीमुळे होणारी टंचाई कमी होते. त्यामुळे कृषी क्षेत्राला फायदा होईल या उद्देशाने यशवंतराव चव्हाण यांनी कोयना आणि उजनी प्रकल्पाची उभारणी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण असल्याची दिसते.

**सहकाराला चालना**

यशवंतरावांनी आपल्या काळात एकूण १८ सहकारी साखर कारखान्यांची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले. हे साखर कारखाने म्हणजे विकासाचे आणि समृद्धीचे प्रतीक आहेत. कारण, एका सहकारी साखर कारखान्याच्या जोरावर औद्योगिक वसाहत होते.साखर कारखान्यामुळे सहकारी बँका, सहकारी कुक्कुटपालन केंद्रे यातून शेतीचे मार्केटिंग आणि रोजगाराची निर्मिती झाली. आज ते संपुष्टात आणले जात असल्याचे दिसून येते.

**कुळ कायद्याची अंमलबजावणी**

शेतीमध्ये प्रत्यक्ष कष्ट करणारा जो माणूस आहे त्याला कुळ म्हटले गेले आहे. सन १९३९ च्या कुळ कायद्यानुसार सर्वप्रथम जमिनीत असणाऱ्या कायदेशीर कुळांची नावे सातबाराच्या इतर हक्कात नोंदली गेली. त्यानंतर १९४८ चा कुळ कायदा अस्तित्वात आला त्यामुळे कुळांना अधिक अधिकार प्राप्त झाले.परंतु त्यानंतर 1955 मध्ये भाऊसाहेब हिरे महसूल मंत्री असताना कुळ कायदा अस्तित्वात आला.परंतु त्याची प्रत्यक्षामध्ये अंमलबजावणी 1957 मध्ये करून देशाला नवीन विचार देण्याचे काम यशवंतरावांनी केल्याचे दिसून येते.

**कमाल जमीन धारणा कायदा**

महाराष्ट्रात कमाल शेत जमीन धारणा कायदा १९६१ साली आला. प्रत्येक राज्याची कमाल शेत जमीन धारणा मर्यादा वेगवेगळी आहे. महाराष्ट्रात कमाल जमीन धारणा कायद्यान्वये कोरडवाहू शेतजमिनीसाठी ५४ एकर जमीन आणि जमीन बागायत असेल तर १८ एकर अशी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

शेतमाल विकणारे जास्त आणि नियंत्रित बाजारपेठ समिती कायद्यामुळे शेतमाल विकत घेणारे कमी अशी विसंगत स्थिती निर्माण झाली. यामुळे अर्थातच शेतमालाचे भाव पडले. जमीन धारणा कमी असल्यामुळे दोन एकरवर कितीही कष्ट घेऊन किती उत्तम पीक घेतले तरीही त्या शेतकऱ्याचे जीवनमान उंचावू शकत नाही. आज जागतिक स्पर्धेत उतरण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान उपयोगात आणणे आवश्यक ठरते. शेतकऱ्याला त्याच्या शेताच्या लहान तुकड्यावर अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे आर्थिकदृष्ट्या सोयीचे ठरत नाही.

**कृषी शिक्षण व कृषी विद्यापीठाच्या स्थापनेला प्रोत्साहन**

पूर्वीच्या काळी धर्म व कृषीव्यवसाय यांचे फार जवळचे संबंध होते व धर्मगुरू मार्फत कृषिचे थोडेफार शिक्षण मिळत असे. पाश्चात्य देशांत सोळाव्या शतकापासून मात्र हे संबंध कमी होऊ लागले व अठराव्या शतकात कृषीविषयक थोडेफार प्रयोगही करण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रतील शेतकऱ्यांना कृषी विद्यापीठ मार्फत मार्गदर्शन मिळावे, नवनवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करता यावी, शेती संदर्भात पूर्ण शिक्षण मिळावे यासाठी यशवंतरावने कृषी शिक्षणावर भर दिल्याचे दिसून येते. शेती संर्भतील ज्या समस्या असतील त्या कृषी विद्यापीठामार्फत सोडवल्या जाव्यात या उद्देशाने यशवंतराव चव्हाण यांनी राज्यात कृषी विद्यापीठाच्या स्थापनेला

प्रोत्साहन दिले. शेतीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे. शेतकरी आणि शेतीशी संबंध असणारा मनुष्य हा शिक्षित असल्याशिवाय शेती लाभदायक होणार नाही. यावर माझा विश्वास आहे आणि म्हणून शेती संबंधीचा शास्त्रीय दृष्टिकोन अगदी झोपडीतील शेतकऱ्यापर्यंत नेऊन पोहोचवण्याची आवश्यकता असल्याचे मत मांडले. शेतीचा प्रश्न एवढा गुंतागुंतीचा व बिकट आहे की, त्याने भारताच्या जीवनातच एक प्रकारची व्यथा निर्माण केली आहे असे यशवंतराव चव्हाणांना वाटत होते.

**समारोप**

यशवंतराव चव्हाण यांनी स्पष्ट केलेल्या आपल्या कृषी विषयक विचारातून, कृषी हा व्यवसाय समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे दिसून येते. कृषी व्यवसायाने मनुष्य शहाणा होतो असे नव्हे तर त्यामुळे समाज व राष्ट्र प्रगतीच्या दिशेने वाटचाल करते. देशाची किंवा समाजाची प्रगती व्हायची असेल तर शेती किंवा शेतीपूरक तंत्रज्ञान वापरण्याची आवश्यकता असल्याचे दिसते. कृषीचा दर्जा लोकांच्या झालेल्या प्रगतीवरून दिसून येतो. पाश्चात्त्य देशातील लोकांनी आपली प्रगती कृषीच्या जोरावर केली आहे. महाराष्ट्र जर प्रगतीपथावर जायचं असेल तर प्रथमतः खेड्यापासून शहरापर्यंत लोकांना कृषी शिक्षण दिले पाहिजे. यावर भर दिला तर महाराष्ट्र कृषी क्षेत्राच्या बाबतीत प्रगत होऊन सुजलाम व सुफलाम बनेल असे यशवंतराव चव्हाण यांना वाटत होते.

**संदर्भ**


१. नीता वाणी,(२०१५), कृषी अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, द्वितीय आवृत्ती.

२. शिंदे अण्णासाहेब,(१९८८), महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन, परिसंवाद.

३. शरद पवार, महाराष्ट्रातील दुष्काळ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई.

४. गंगाधर कायदे- पाटील, (२००७), कृषी अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक,चतुर्थ आवृत्ती.

५. चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, मुंबई,१९६२, पृ. क्र.१४०.

६. चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, मुंबई, १९६२, पृ. क्र.१५६, १५७.

७. अनंत पाटील, देशदूत टाईम प्रकाशिक लेख, ४ आगस्ट.२०२०.

८. प्रफुल फडके, प्रहार टाईम प्रकाशिक लेख, २५ नोव्हेंबर २०१८.

९. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, पुणे, १९८४.

१०. शेवते अरुण, कृष्णाकाठाचा माणूस, मुंबई ऋतुरंग प्रकाशन, १९९८.

११. डॉ. उल्हास उढान, महाराष्ट्र टाईम प्रकाशित लेख, १२ मार्च २०२१.

MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण घेऊन निघालोय...



आयुष्याची लढाई लढताना
दुःख आणि यातनांचे
डोंगर पार करून मी चालत गेलो ही खडतर वाट
कुणी काटे पेरले वाटेत
तर काहींनी स्पीड ब्रेकर उभे केले
पावला पावलावर...
वैशाखी उन्हाच्या झळा सोसत
मी अनुभवलाय हरेकदा दुष्काळ दाह
मायबापांच्या कष्टाचा
पाढा वाचीत गेलो
आयुष्याची बेरीज-वजाबाकी समजून घेऊन...
जगण्याचं गणित सोपं व्हावं म्हणून
जायबंदी करून पायात
कोलदांडा घालण्याचे प्रयत्नही झालेत
नाही असे नाही...
नजरकैदेचा खडा पहाराही सोसावा लागला...
जगण्याच्या या अनामिक वाटेवर
कोणत्याही लाटेवर स्वार
व्हायला आवडलेच नाही मला
मला तोडायचे होते पिढ्यानपिढ्या
आमच्या पायात अडकवलेल्या
अमानुष, अन्यायी बेड्या
तोडायचे होते बलदंड, बेफाम बेलगामी
बेजबाबदार साखळदंड...
शब्दांनीच हाक देऊन उठवलं अन
पायात बळ भरलं चालण्याचं

मग मी चालत राहिलो अडखळत
कधी चाचपडत तर कधी सावध बेसावध
वाटा आडवाटा तुडवत
मी निघालोय प्रज्ञा सूर्याच्या दिशेनं...
इथल्या बिचेहऱ्यांच्या माणसांच्या
जगण्याला अर्थ प्राप्त व्हावा म्हणून
हे नांगरूप पडलेलं रान
वहिती करण्यासाठी एकवटून, एकजुटीने
तिफन घेऊन निघालोय मी
या उघड्या बोडक्या माळरानात
विचारांची पेरणी करून
एका दाण्याचे हजारो दाणे करण्यासाठी...

- शिवाजी हुसे